महाराष्ट्र शासन
वन विभाग
# मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त, चंद्रपुर यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, नागपुर रोड, चंद्रपुर- 442401

दुरध्वनी क्र. 07172-256279, 252232
Email id- ccfchandrapur@gmail.com, ccftchandrapur@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-3(1)/जमिन/प्र.क्र.325/2021-22/ 1378 दिनांक :- 21.01.2022

**प्रति,**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व,**
**नागपूर**

**विषय :-** भटाळी ओपन कास्ट माईन या प्रकल्पाच्या विस्तारीकरीता वेस्टर्न कोलफिल्डस लिमी. यांचा 0.20 हे. झुडपी जंगल जमीन वळती करणेबाबत.

**संदर्भ :-** 1. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक एफएलडी-3620/प्र.क्र.40/फ-10, दिनांक 01/01/2021.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.151/2315, दि. 09.12.2021
3. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-1(ब)/सर्व्हे/21-22/484, दि. 24.12.2021

विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र शासनाचे संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये उपस्थित केलेल्या 4 मुद्याच्या अनुषंगाने या आपले संदर्भिय पत्र क्रमांक 14 अन्वये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुददानिहाय अभिप्राय नोंदवून सुधारीत अहवाल सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| 1. | वळतीकरणाचे क्षेत्र केवळ 0.20 हे. असले तरी प्रकल्पासाठी एकूण 838 हे. क्षेत्र लागणार आहे. | भटाळी ओपन कास्ट माईन प्रकल्प दिनांक 13/05/1995 पासून सुरू असून सदर खाणीतील कोळसा चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रास पूरविण्यांत येत आहे. सदर खाणीकरीता खालीलप्रमाणे वेगवेगळ्या अधिसूचनेद्वारे क्षेत्र अधिग्रहीत करण्यांत आलेले आहे. |

| अ.क्र. | अधिसूचनेचा तपशिल | अधिग्रहीत क्षेत्र (हे.) |
|---|---|---|
| 1. | CBA S.O. No. 660, dtd. 15/02/1990 | 287.57 |
| 2. | LA Act 1894 acquisition In the year 2007 | 82.15 |
| 3. | CBA S.O. No. 2525, dtd. 13/09/2011 | 467.21 |
| 4. | Direct purchase | 1.21 |
| | **एकूण :-** | **838.14** |

वरीलप्रमाणे अधिग्रहीत जास्तीत जास्त क्षेत्र कोळसा खाणीकरीता उपयोगात आलेले आहे. सन 2011 चे अधिसूचनेनुसार अधिग्रहीत क्षेत्रात 0.20 हे. झुडपी जंगल क्षेत्राचा समावेश झालेला आहे. उर्वरित क्षेत्र वनेत्तर क्षेत्र आहे.

| | | |
|---|---|---|
| | माहिती इरई नदीच्या बाजूला हा प्रकल्प होणे वन्यजीवांच्या अधिवास व भ्रमणास धोका निर्माण करणारे आहे. | वन व वनेत्तर क्षेत्र मौजा 1. पायली भटाळी 2. चक तिरवंजा 3. तिरवंजा मोकासा 4. चांदसुर्ला 5. किटाळी या गावाच्या हददीतील आहे व सदर गावे ताडोबा-कन्हाळगाव-टिपेश्वर-कावल या वन्यजीव भ्रमणमार्गात येतात. सदर प्रकल्पाच्या सिमेपासून 11.310 कि.मी. अंतरावर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाची सिमा आहे व 1.183 कि.मी. अंतरावर बफर विभागाची सिमा लागलेली आहे.<br>सदर प्रकल्प दिनांक 13/05/1995 पासून सुरू आहे व त्यात केवळ 0.20 हे. वनक्षेत्राचा समावेश होत असल्याने वन्यजीवांचा अधिवास व भ्रमणमार्गास धोका होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. परंतू सदर क्षेत्रात वन्यजीवाचा वावर असल्याने भविष्यात वन्यजीवाच्या भ्रमणमार्गास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>यंत्रणेने सादर केलेल्या अहवालानुसार WII आणि CSSIR-NEERI या संस्थेकडून वन व वन्यजीववावर WCL चे खाणीमुळे होणाऱ्या परिणामाबाबत अभ्यास सुरू असल्याचे कळविलेले आहे. तसेच Wildlife Conservation Plan ची भटाळी ओपन कास्ट प्रकल्पाकरीता आवश्यकता नसल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक Desk-23(2)/WL/Survey/C.No.127/3640/2019-20, दिनांक 30/12/2019 अन्वये यंत्रणेस कळविलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.<br>प्रकल्प फार पुर्वीपासून सुरू असल्याने वन्यजीवांच्या अधिवास व भ्रमणास धोका निर्माण झाल्याची बाब अदयाप दिसून आलेली नाही. परंतु भविष्याचा विचार करता वन्यजीवांचा भ्रमणमार्ग सुरळीत सुरू राहण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.<br>मागणी केल्याप्रमाणे सदर प्रकल्पास प्राप्त Environmental Clearance पत्र दिनांक 13/03/2020 ची प्रत यासोबत जोडून सादर करण्यांत येत आहे. |
| 3. | सदर प्रकल्पाबाबत राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होणे गरजेचे आहे असे वाटते. | वरील बाब विचारात घेउन सदर प्रकल्पाबाबत राष्ट्रीय व राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होणे योग्य राहिल. |
| 4. | सदरच्या प्रकल्पामुळे वाघ व इतर वन्यजीव प्राणी यांच्या अधिवासावर व भ्रमणमार्गावर विपरीत परिणामाबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घ्यावेत. | मुददा क्र. 2 मध्ये वस्तुस्थितीदर्शक अभिप्राय सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने सदर बाबीवर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय शासनास सादर करण्यात यावे ही विनंती. |

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

(एन.आर.प्रविण)
**मुख्य वनसंरक्षक**
**चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर**

O/C 21.1.22

**प्रतिलिपी :-** विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.